**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
**PHONE : EPABX – 2609000**
**www.unishivaji.ac.in**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ.जा.क्र./शिवाजी वि./रा.से.यो./ई–मेलद्वारे /१४८०                                        दिनांक ३०/०७/२०२६

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय : विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना एककामध्ये सन २०२६–२७ करीता प्रवेश प्रक्रियेबाबत...

महोदय / महोदया,

युवा व खेळ मंत्रालय, भारत सरकार तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे अधिनिस्त राज्यभरातील प्रत्येक विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना एककांची प्रभावी अंमलबजावणी करणेत येत असून राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे (N.S.S.) वेळोवेळी विविध विद्यार्थीकेंद्रीत व समाजाभिमूख कार्यक्रम, उपक्रम राबविणेत येतात. यामध्ये मुख्यत्वे वर्षभरातील नियमित कार्यक्रम तसेच दत्तक खेडेगाव परीसरातील विशेष शिबीर कार्यक्रमांचा सामावेश असतो याचबरोबर विद्यार्थी, विद्यार्थीनी स्वयंसेवकांना जिल्हा, विद्यापीठ, राज्य तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध शिबीरे, कार्यशाळा, कार्यक्रमांमध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी देणेत येते.

याबाबत सदर पत्राद्वारे आपणास कळविणेत येते की, सन २०२६–२७ पासून शिवाजी विद्यापीठ परीसराकरीता ३०० विद्यार्थीसंख्येचे स्वतंत्र राष्ट्रीय सेवा योजना एकक (N.S.S. Unit) स्थापित करणेत आलेले असून सदर राष्ट्रीय सेवा योजना एककामध्ये आपल्या अधिविभागातील इच्छूक फक्त १० विद्यार्थी, विद्यार्थीनी यांची दिनांक १० ऑगस्ट, २०२६ रोजीपर्यंत **https://forms.gle/wbrErureo72sdvSE9** या गुगल फॉर्मद्वारे प्रवेश पूर्व नावनोंदणी करणेत यावी ही विनंती.

विद्यापीठ एन.एस.एस. युनिटमध्ये प्रवेशित विद्यार्थी, विद्यार्थीनी सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षामध्ये पदव्युत्तर पदवीकरीता (P.G.) शिक्षण घेत असल्यास प्रथम वर्षाला असणे अपेक्षित असेल व पदवीचे (U.G.) शिक्षण घेत असल्यास प्रथम अथवा द्वितीय वर्षामध्ये शिक्षण घेत असणे अपेक्षित असेल कारण याबाबत एन.एस.एस. मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनी स्वयंसेवकाने सलग दोन शैक्षणिक वर्षामध्ये आपला एन.एस.एस.युनिटमधील प्रवेश कायम ठेवून दोन वर्षे पुर्ण करणे आवश्यक असेल, याची नोंद घेणेत यावी.

कळावे,

आपला विश्वासू ,

(डॉ. कबीर खराडे )
प्र.संचालक, रा.से.यो.
राष्ट्रीय सेवा योजना